# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ९३५/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.दत्ताराम कृष्णा पेडामकर,
मीरअम्मानगर, घर नं. २२३ एम,
नेहरु सेंटर मागे, डॉ.ए.बी.रोड,
वरळी, मुंबई १८.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, कळकवणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५ ६०४.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, कळकवणे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५ ६०४.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २६/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २७/८/२०२१ | ३०/८/२०२१ | ३०/९/२०२१ | ३०/१०/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२५/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २६/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिलीप धर्मराज तांबे, मंडळ अधिकारी कळकवणे व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.संदेश रघुनाथ आयरे, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" आम्ही दि.१९.०७.२०२१ रोजी मा.तहसिलदार यांच्या नावाने दिलेल्या अर्जावर केलेली कार्यवाहीची प्रती आपल्या दप्तरी असून त्यांची संपूर्ण प्रती देण्यात यावी व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.३०/१०/२०२१ रोजी, *"जन माहिती अधिकारी मंडळ अधिकारी कळकवणे यांनी अपिलार्थी यांना दि.३०/९/२०२१ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागणी केलेली जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती सहायक जन माहिती अधिकारी यांनी विना मोबदला माहिती उपलब्ध करून दयावी व जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत अर्जदार यांना विस्तृतपणे कळविणेत यावे."* असा निर्णय दिलेला आहे.

कागदपत्रांचे अवलोकन दिसून येते की, मुद्दा क्र.२ ची माहिती दिली आहे. मुद्दा क्र.१ व ३ ची माहिती देण्यात आली नाही.
यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय चिपळूण यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली मुद्दा क्र.१ व ३ ची माहिती ३० दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे. तसा अहवाल पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१६/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

सही/-
(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय चिपळूण,
ता.चिपळूण जि.रत्नागिरी ४१५६०५

**विवेचन**

उपरोक्त आदेशान्वये सदर प्रकरणाची सुनावणी आज आयोजित करण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

सदर प्रकरणी दि.२६/८/२०२५ रोजीच्या सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय चिपळूण यांनी मुद्दा क्र.१ व ३ ची माहिती ३० दिवसात नि:शुल्क पुरविणेबाबत आदेश केले होते. तथापि आजच्या सुनावणीस सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. त्याचप्रमाणे त्यांचेकडून कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय चिपळूण यांनी आयोगाच्या दि.२६/८/२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्द्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय चिपळूण **- यांना प्रत** --
-- तहसिलदार चिपळूण,
तहसिलदार कार्यालय चिपळूण,
ता.चिपळूण जि.रत्नागिरी ४१५६०५ **यांचेमार्फत रवाना.** (तहसिलदार यांनी सदरची प्रत तात्काळ संबंधित जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)